PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chandne shimpit jaa
Year: 1982

Song: Kadhitari kuthetari
Lyricist:

कधीतरी कुठेतरी
कधीतरी कुठेतरी
मी भेटलो गं एकदा
अहं... अनेकदा
अन् वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
अनेकदा

या स्थळी गं याच वेळी
रंगली प्रीती खुळी
या स्थळी गं याच वेळी
रंगली प्रीती खुळी
रंगल्या वेड्या जीवाला
भान हे नव्हते मुळी
त्याक्षणी ओठावरी या
त्याक्षणी ओठावरी या
ओठ भिडले एकदा
अहं... अनेकदा
अन् वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
अनेकदा

चंद्र नव्हता साक्षीला
ना तारका तारांगणी
चंद्र होता या मिठीत
तारका तव लोचनी
चंद्र नव्हता साक्षीला
ना तारका तारांगणी
चंद्र होता या मिठीत
तारका तव लोचनी
संथ या पाण्यावरीही
संथ या पाण्यावरीही
लहर आली एकदा
अहं... अनेकदा
हो वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
अनेकदा

मंद या वाऱ्यासवे
का दरवळे मधुगंध हा
मंद या वाऱ्यासवे
का दरवळे मधुगंध हा

रंग जे क्षितिजावरी
गालावरी या तू पहा
मिलनाच्या या घडीला
मिलनाच्या या घडीला
जवळ ये तू एकदा
अहं... अनेकदा
हं... वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
अनेकदा

रात्र होती ती मुलायम
आ आ ला ला ला ला...
रात्र होती ती मुलायम

स्पर्श तो होता नवा
दाह या देही जरी तो
चंदनाचा गारवा
पापणीच्या आत सजले
पापणीच्या आत सजले
स्वप्न नशीले एकदा

अहं... अनेकदा
अन् वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
वाहिली पायी तुझ्या
मी यौवनाची संपदा
अनेकदा

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*